
# निसर्ग मार्गदर्शक कार्यशाळा

## ठिकाण- आंजर्ले

### दिनांक- २५ नोव्हेंबर २०१६







वनविभाग रत्नागिरी
महाराष्ट्र शासन

सह्याद्री निसर्ग मित्र
चिपळूण

giz Deutsche Gesellschaft für Internationale Zusammenarbeit (GIZ) GmbH

On behalf of:
Federal Ministry for the Environment, Nature Conservation, Building and Nuclear Safety
of the Federal Republic of Germany

# मनोगत

कोकण म्हणजे एका बाजुला अथांग पसरलेला अरबी सागर तर दुसऱ्या बाजूला म्हणजे पुर्वेला गगनाला गवसणी घालणाऱ्या सह्याद्रीच्या पर्वतरांगा. मधल्या चिंचोळ्या पट्टीत आहे "हिरवेगार तळकोकण".

येथे दुथडीभरुन वाहणाऱ्या नद्या आहेत, झूळझूळ वाहणारे झरे आहेत, डोंगरकड्यांवरुन उड्या मारत खळखळणारे मनमोहक धबधबे आहेत, हिरवीगार डवरलेली झाडे, त्यावर बिलगणाऱ्या वेली आहेत. बागडणारे विविध आवाजात साद घालणारे पक्षी आहेत, फ़ुला-फ़ळांवर रुंजी घालणारी फ़ुलपाखरे आहेत, वाऱ्याच्या झोक्याबरोबर डोलणाऱ्या गवतांमधून सळसळणारे विविध प्रकारचे साप आहेत. अशा आकर्षक कोकणात जाण्यासाठी घरंगळणारे काळेकुळकुळीत डांबरी रस्तेही दृष्टीस पडतात. आपल्या धावपळीच्या जिवनात विसाव्याचे चार क्षण हवे असतात. अशावेळी काही सुंदर पाहावयास, ऐकावयास, अनुभवावयास मिळाले तर शिणवटा दुर पळून जातो व आपण जिवनतील संघर्षांना सामोरे जाण्यासाठी सिद्ध होतो. यासाठी वीक एंडला फ़िरण्यासाठी कोकणासारखी सुंदर जागा नाही. व तसे पर्यटक मोठ्या प्रमाणात कोकणात येत असतात.
त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी गरज आहे निसर्ग मार्गदर्शक बनण्याची. याच साठी सुरवात म्हणून काही पक्षी, प्राणी, वनस्पती यांची माहीती देत आहोत.
निसर्ग मार्गदर्शक बनताना पहीली पायरी म्हणून नक्की उपयोग होइल. पूढे विविध पुस्तके आहेतच.

ठेवू दूर दृष्टी रक्षू निसर्ग सृष्टी

| | |
|---|---|
|  | **Jungle Crow- (जंगल कावळा)**<br>**आकार :**<br>शहरे आणि खेड्यांमध्ये राहाणारा कावळा हा उत्तम सफ़ाई कामगार आहे. जंगलात व रस्तावर मेलेले प्राणी, मच्छी-मटणाचा कचरा, व जे भेटेल ते खाद्य खाण्यात हा तरबेज आहे.जंगली कावळा घरकावळ्यापेक्षा थोडा मोठा पूर्ण काळा चोच मोठी व मजबूत टोक बाकदार. नर मादी दिसायला सारखेच असतात. जंगल कावळ्याची वीण  डिसेंबर ते एप्रिल या काळात होते. |
|  | **Woolly necked stork (पांढ-या मानेचा करकोचा)**<br>**आकार :**<br>आकाराने मध्यम हंसाएवढा. तीन फ़ूटापर्यंत उंच, मान व शेपटी खालचा भाग पांढरा, डोके, चोच व पाठिवरचा रंग काळा, लांब तांबडे पाय. नर व मादी दिसायला सारखेच. शेते, भातशेती, जंगलातील दलदली इ. ठिकाणी आढळतात. नेपाळ भागात १२५० मी उंचीपर्यंत आढळतात. |
|  | **094 White-bellied Sea Eagle**<br>**पांढऱ्या पोटाचा सागरी गरुड**<br>आकार : घार**+** : ७१सें.मी.<br>समुद्रकिनारा आणि परिसरात दिसतो**.** पाण्यात सुर मारता येत नसल्याने तो पाण्याच्या पृष्ठभागावर येणारे मासे व सागरी साप आपल्या पायांच्या नख्यांमध्ये पकडून शिकार करतो**.** ऑक्टोबर ते जून असा यांचा विणीचा हंगाम असतो**.** काटक्या आणि हिरव्या पानांपासून मोठे घरटे बनवितात**.** एकदा बनवले की  मग हे घरटे पुढे अनेक वर्ष वापरले जाते**.** |
|  | **Common Myna** सामान्य मैना<br>**आकार :**<br>हे पक्षी गाव व शहरांमध्येही आढळून येतात. गांडूळ, किडे तसेच वड, पिंपळ, उंबर या झाडांची फळे हे त्यांचे अन्न. हे पक्षी भिंतीच्या, छपरांच्या अथवा झाडांच्या भोकांमधून कागद, वाळलेले गवत व इतर वस्तू पसरवून घरटे बांधतात. |


| | |
|---|---|
|  | **289 White Breasted Kingfisher**<br>पांढऱ्या छातीचा खंड्या<br>आकार : मैना+ : २८सें.मी.<br>सर्वत्र आढळून येणार पक्षी. मासे, लहान बेडूक, सरडे, टोळ व इतर कीटक असे याचे अन्न आहे. प्रामुख्याने मार्च ते जुलै हायांचा विणीचा हंगाम असतो. पांढऱ्या रंगाची ४ ते ७ गोलाकार अंडी असतात. |
|  | **Little Cormorant (छोटा पाणकावळा)**<br>आकार : कावळा+ : ५१सें.मी.<br>महाराष्ट्रात तलाव, डबकी व नद्यांजवळ आढळतो. उत्कृष्ट पाणबुड्या पक्षी असून पाण्याखाली राहून माश्यांची शिकार करतो. पाण्याजवळ असलेल्या झाडांवर छोट्याफांद्यांची उथळ घरटी बांधतो.. |
|  | **012 Grey Heron (राखी बगळा)**<br>आकार : लांडोर+ : ९८सें.मी.<br>पाणथळ जागेत आढळतो.  मासे, बेडूक, असेयाचे खाद्य. घरटे मचाणा सारखे असून काटक्यांचे बनवले जाते. याच्या मध्यभागी गवताचा वापर करतात. घरटॆ पाण्यालगतच्या झाडावर बांधले जाते. |
|  | **Lesser Whistling Duck (अडई)**<br>**आकार :**<br>बदकापेक्षा लहान, लाल रंग, चिला व गाद या पाणवनस्पतींनी भरलेल्या तळ्यात थव्याने रहातात. उडताना 'सि सिक' अशी सतत शीळ एकू येते. झिलाणी, सरोवरे, खाजणी, भातशेतीच्या प्रदेशात आढळतात. यांची वीण जुन ते ऑक्टोबर या काळात होते. |

| | |
|---|---|
|  | घाणेरी<br>लहान भडक रंगाची फुले असलेली ही विदेशी वनस्पती भारतीय जंगलामध्ये पसरली आहे. वनस्पतीतील असणारा विशिष्ट द्रव्यामुळे गुरे आणि इतर जनावरे ही वनस्पती खात नाही. फुलपाखरांना आकर्षित करण्यासाठी सुद्धा या झाडांचे उदयानांमधे रोपण करण्यात येते. |
|  | कोष्ट<br>ही एक पावसाळी वनस्पती आहे. मुळे ही औषधी असतात. ऑगस्ट ते ऑक्टोबर महिन्यात फुले येतात. कडू मुळे औषधी असतात. त्यांचा पोटविकार, अस्थ्मा, संधिवात यांसारख्या आजारांवरील उपचारावर वापर होतो. |
|  | भारंगी - (Clerodendrum serratum)<br>ही वनस्पती कोकणात ओसाड जागेवर उगवते. याला सुरेख निळी फ़ुले असणारे घोस येतात. याची पाने चांगली मोठी असून कोवळ्या पानांची भाजी करतात. कफ़ ज्वरात भारंग मूळ दशमूल बरोबर देतात.<br>. |
|  | अंजनी - (Memecylon umbellatum)<br>मध्यम उंचीचा दाट झुडुपासारखा वाढणारा डोंगर उतारावर आढळणारा वृक्ष आहे. निळसर जांभळ्या लहान लहान फ़ुलांचे दाट गुच्छ ही अंजनीची विशेषता आहे. थंडीच्या दिवसात फ़ुलतात पिकलेली फ़ळे पक्ष्यांचे खाद्य आहे. |

| | |
|---|---|
|  | <u>बहावा - (Cassia fistula)</u><br>बहाव्याचा मध्यम वृक्ष होतो. पाने संयुक्त अशी एका लांब देठावर येतात. वसंत ऋतूत पिवळ्या रंगाची फ़ार सुरेख फ़ुलांचे घोस येतात व नंतर शेवग्याच्या शेंगासारख्या शेंगा लटकत असतात. बहाव्याची पाने, मुळे, फ़ळांचा गर, बिया तसेच फ़ुले औषधात वापरतात. बहाव्याच्या फ़ुलाचा गुलकंद करुन श्वासमार्गातील कोरडेपणा कमी करण्यासाठी वापरतात. |
|  | <u>कळलावी -</u><br>१ ते २ मी. लांब, वन औषधीच्या जातीत मोडणारी ही वेल आहे. वीतभर लांबीच्या मांसल कंदामधून हा वेल बाहेर येते. थोडया थोड्या अंतरावर समोरासमोर येणारी बिनदेठाची पाने असतात. ऑगस्टमध्ये फ़ंद्याची शेवटच्या टोकाला लांब देठाच्या उलट्या लटकणाऱ्या कळ्या येतात. पाकळ्या सुटावल्या की वरच्या दिशेला वळतात. आडवे चक्राकार पसकलेले ६ पुंकेसर असतात. पुंकेसरांच्या शेवटचे परागकोष पिवळ्या रंगाचे, काटकोनात चिकटलेले असते. कोकणात डोंगराळ भागात, जंगलात, उतारावर उगवणारी ही वनस्पती आहे. |
|  | <u>निरगुडी (Vitex Negundo) -</u><br>ही कायमस्वरुपी वाढणारी वनस्पती असून नदीकाठ, रस्त्याच्या कडेने, शेताच्या बांधावर तसेच ओसाड जागेत झुडूपासारखी वाढते. पाने त्रिदल असून त्यांना एक विशिष्ट वास येतो. हिला निळसर रंगाचे बारीक फ़ुलांचे तुरे येतात. निर्गुडीच्या पानाचा रस संधिवात, सायटिका, केस पांढरे होणे, स्मृती वाढविण्यासाठी ताज्या पानांचा रस मधात मिसळून घ्यावा. |

| | |
|---|---|
|  | बिबट्या- Leopard- बिबट्या हा सस्तन प्रण्यांतील एक सर्वाधिक चपळ, सावध व निर्भय असा प्राणी. आकाराने वाघापेक्षा लहान. वजन ९०kg पर्यंत व लांबी १०० ते १०५ मी. पर्यंत असते. बिबट्याच्या शरिराचा रंग पिवळसर असून त्यावर गुलाबाच्या फुलासारखी काळ्या रंगाची नक्षी असते. बिबट्या एकाकी प्राणी आहे. तो रात्री शिकारीला बाहेर पडतो. कधीकधी दिवसाही शिकार केल्याची उदाहरणे आहेत. हरणे, गुरे, माकडे, घुशी, कुत्रे इ. त्याचे खाद्य आहे. तो जंगले, पठारी प्रदेश, आडोसा, झुडपे, गुहा इ ठिकाणी राहतो. |
|  | तरस- striped hyena<br>तरस हा कुत्र्या सारखा दिसणारा प्राणी तीन फुट उंच व तीन फुट लांब असतो. गवताळ माळरान, उंच गवत, नदी नाल्यांचे खोरे, गुहा, खिंडी किंवा खडकांच्या घळीमध्ये तरस आढळतो. शरीराचा रंग पिवळसर राखाडी त्यावर काळे उभे पट्टे असतात. वजन तीस किलोपर्यंत व आवाज हसल्यासारखा असतो. मृत जनावरे व प्राण्यांची हाडे ते खात असल्याने त्याला निसर्गाचे सफ़ाई कामगार असेही म्हंटले जाते. |
|  | कोल्हा- Jackal - खॆड्यापाड्यातील रानात कोल्हा वावरताना आपल्या नजरेस पडतो. लांडग्यापेक्षा छोटा कोल्हा सव्वा फ़ूटपर्यंत उंच व दोन ते अडीच फ़ूट लांब असतो. त्याचे शेपूट झुबकेदार व केसाळ असते. कोल्हाचे वजन ८ ते १० किलो व रंग फ़िकट पिवळा असतो. काही कोल्हे लालसर तपकिरी असतात. गावातून कोंबड्या पळवत असल्याने व कोल्हेकुई मुळे ते बदनाम झाले आहेत. लोकांना कोल्हे आवडत नाहीत. कोल्हाचे मुख्य खाद्य उंदीर, घुशी, बक-या, मासे, खेकडे आहे. |
|  | भेकर- Barking Deer - भेकर हरीणांच्या सारंग कुळातील हरीण आहे याचे वैशिष्ट्य म्हणजे इतर सारंग कुळातील हरणां सारखे याला शिंगे नसतात याचे नाव भेकर हे त्याच्या आवाजावरुन पडले आहे. याला भुंकणारे हरिण असेही म्हणतात. भेकरची लांबी १०० ते ११० से.मी आसून उंची ४०-४५ से.मी पर्यंत भरते. उष्ण कटिबंधातील पानगळीची जंगले, गवताळ प्रदेश व खुरट्या वनस्पती आढळते. सहसा पाण्यापासून दूर न जाणारे भेकर खुप सतर्क असते. |

| | |
|---|---|
|  | वानर- (Hanuman Langur)- हनुमान वानर किंवा काळ्या तोंडाचे वानराच्य शरीराचा रंग काळसर राखाडी असतो. भारतातील सर्व जंगलात ही वानरे आढळतात. वानराला हनुमानाचे वंशज समजले जाते. त्यामुळे भारतीय माणूस त्याला मारत नाही. एका टोळीत २०-२५ वानरे असतात. मोठा बलवंत वानर (हुप्या) टोळीचा नायक असतो. धोका जाणवल्यास खॅक-खॅक-खॅक असा आवाज काढतात व संपुर्ण जंगलाला सावध करतात. |
|  | उद मांजर/पाण मांजर- Common Ofter/Lutra/Lutra- हा प्राणी पाण्यातील माशांची शिकार करतो. दिसायला हा कुत्रा मांजरासारखा असल्याने याला पाणमांजर/पाणकुत्रा असेही म्हणतात. याच्या शरीरावर राठ तपकिरी केस असतात. पोटाचा भाग फ़िकट तपकिरी तोंड, गळा, छातीवर पांढरी केस असतात. कान छोटे असतात. डोक्यापासून शेपटीपर्यंत लांबी चार फ़ुटापर्यंत व वजन ९ ते ११ किलो पर्यंत असते. मासे हे त्यांचे मुख्य खाद्य आहे. अनेक युक्त्या करुन ते मासेमारी करतात. |
|  | रानडुक्कर - Indian wild Boar- खेड्यापाड्यात आपण पाळीव डुकरे पाहातो ते खेड्यातील सफ़ाई कामगार आहेत. त्यांचेच भाऊबंद जंगलात राहतात. त्यांना आपण रानडुक्कर म्हणतो. रानडुकरे फ़ार ताकदवान, सावध असतात. नर डुक्कर तीन फ़ुट लांब व तेवढाच उंच असतो. नव्वद किलो वजनाचे रानडुक्कर कळपात राहतात. रानडुकराचा रंग काळा, राखट-तपकिरी असतो. रानडुकरे कंदमुळे, पडलेली फ़ळे, मेलेले जनावराचे मांस खातात. त्यामुळे निसर्ग स्वच्छ राहण्यास मदत होते. रानडुक्कर हा जंगलतील मस्तमौला प्राणी आहे. वाघही त्यांना घाबरतात. |
|  | उदमांजर/ काळमांजर- Small Indian Civet/Indian palm civet- उदमांजराच्या सर्वात जवळचे आप्त म्हणजे घरगुती मांजरे. उदमांजर/काळमांजराचे शरीर लांब,डोळे लंबवर्तुळाकार, तोंड टोकदार व पंजे छोटे असतात. त्यांचे डोळे भेदक असून घ्राणेंद्रिये व श्रवणेंद्रिये तीक्ष्ण असतात. हि मांजरे मांसभक्षक व शाकाहारीही असतात. उदमांजराच्या (Small Indian Civet) लालसत पांढ-या रंगावर काळे ठिपके असतात. तर काळमांजर (Indian Palm Civet) पूर्ण काळे असते व हे निशाचर असतात. |



**<u>वड (अर्टिकांसी/मोरेसी)</u>  <u>फ़ायकस बेंगंलेन्सिस</u>**

मराठित याला वड, बर किंवा वट म्हणतात, तर तमिळ भाषेत अला आणि हिंदीत बोर किंवा बरगद.

**<u>कुठं आढळतं</u>** : हे मूळचं भारतातलंच झाड. भारतात ते सगळीकडं आढळतं.

**<u>सर्वसाधारण वर्णन</u>** : या झाडाचा विस्तार प्रचंड असतो. हे झाड खूप उंच वाढत. त्याच्या फ़ांद्यांना लोंबती मुळं फ़ुटतात. ती जमिनीत जाऊन रुजतात आणि मूळ झाडाला आणखी आधार देतात म्हणुन हे झाड शेकडो वर्ष जगू शकत. या लोंबत्या मुळांनाच पारंब्या म्हणतात. त्याची साल गडद करड्या रंगाची असून तिचे पापुद्रे निघतात.



**<u>नारळ (पामसासी)</u>  <u>कोकोस न्युसिफेरा</u>**

या झाडाला हिंदीत नारियल आणि तमिळ भाषेत तेंकार म्हणतात.


**<u>कुठं आढळतं</u> :** हे झाड मूळचं कुठलं, ते गूढच आहे. दक्षिण अमेरिका आणि भारतात नारळाची झाडं गेल्या कित्येक शतकांपासून आहेत.


**<u>सार्वसाधारण वर्णन</u>** : झाडाची पूर्ण वाढ होऊन त्याला फळ यायला साधारपणे दहा वर्ष लागतात. त्याला पुष्कळ झावळ्या येतात. हे झाड उंच असतं. त्याची वाढ मध्यम-ते-जलद असते. त्याचं खोड बारीक आणि बहुधा सरळसोट असतं. त्यावर मधूनमधून खाचा असतात. जमिनीजवळ खोड फुगीर असतं आणि त्याच्या भोवताली मुळं पसरलेली असतात.


| | |
|---|---|
|  | **<u>भेंडी (माल्वेसी)</u>** **<u>थेस्पेसिया पॉपुल्निया</u>**<br><br>या झाडाला 'अंब्रेला' आणि 'पोर्शिया' अशीही नावं आहेत. याला हिंदीत 'परसिपू', बंगालीत 'डंबला', मराठीत 'भेंडी' आणि गुजरातीत 'पारस पीपल' म्हणतात.<br><br>**<u>कुठं आढळतं</u> :** भारत, ब्रह्मदेश, आफ्रिकेचा काही भाग, तसेच आशिया खंड आणि पॅसिफिक विभाग यांच्यांतील उष्ण प्रदेश या भागात हे झाड आढळतं. समुद्रापासुन फार दूर, तसंच अति थंड भागात ते जगू शकत नाही. उष्ण कटिबंधातील सागर किनाऱ्याच्या प्रदेशात ते जोमानं वाढतं.<br><br>**<u>सार्वसाधारण वर्णन</u>** : लहान-ते-मध्यम आकाराचं हे झाड जवळजवळ सदाहरित असतं. ते भरभर वाढतं, पण अल्पायुषी आहे. त्याची साल मऊ, करड्या रंगाची असते. त्याच्या पानांचा विस्तार घुमटाकार पसरतो. त्यामुळं हे झाड छत्रीसारखं दिसत. |
|  | **<u>कैलासपती (मार्टेसी)</u>** **<u>गियानेन्सिस</u>**<br><br>या झाडाला हिंदीत शिवलिंगम, बांगला आणि तमिळ भाषांमध्ये नागलिंगम आणि इंग्रजीत कॅननबॉल किंवा मंकीपॉट्स अशी नावं आहेत.<br><br>**<u>कुठं आढळतं</u> :** हे झाड मूळचं दक्षिण अमेरिकेतलं, पण उष्ण कटिबंधातल्या सर्व प्रदेशांत ते चांगलं वाढतं. त्याला दमट हवामान आणि सखल जमीन जास्त मानवते.<br><br>**<u>सार्वसाधारण वर्णन</u>** : हे झाड खूप मोठं, भरभर वाढणारं आणि सबाहरित असतं. त्याचं खोड खूप जाड आणि सरळ असतं. त्याची साल खरखरीत आणि करड्या-तपकिरी रंगाची असते. जमिनीपासून बऱ्याच उंचीवर खोडाला फांद्या फुटतात. फांद्या वेड्या वाकड्या फुटतात, त्यामुळं झाड बेडौल दिसतं. |

| | |
|---|---|
|  | नाग -(Spectacled Cobra)-<br>महाराष्ट्रात सर्वत्र आढळणाऱ्या या सापाची सरासरी लांबी 5 फुट तर अधिकतम लांबी 7 फुटांपर्यंत असू शकते. हा मुख्यत्वे जंगल, खडकाळ भाग, भातशेती व मनुष्यवस्तीतही आढळून येतो. बेडूक, उंदीर व क्वचित प्रसंगी छोटे साप असे याचे खाद्य आहे. यांचा प्रजनन काळ एप्रिल–मे दरम्यान असतो. यास निमुळत्या तोंडामुळे व्दिनेत्री दृष्टी असते. हा दिनचर व निशाचर आहे. |
|  | मण्यार (Common krait)- हा विषारी साप आहे. निळसर काळ्या रंगावर, शेपटीकडे ठळक होत जाणारी पांढरी कडी असतात. लांबी चार ते पाच फुट असते. हा साप निशाचर आहे. |
|  | घोणस-(Russells Viper) रंग- तपकिरी रंगावर फ़ुलांच्या पाकळ्य़ा किंवा रुद्राक्षाच्या माळांप्रमाणे नक्षी-डोक्यापासून शेपटीपर्यंत असते. हा विषारी साप आहे. याचा रंग तपकीरी असुन त्यावर साखळीप्रमाणे/ फ़ुलांच्या पाकळ्याप्रमाणे पिवळसर नक्षी असते. याचे डोके त्रिकोणी आकारचे व शेपटी आखूड असते. लांबी पाच ते सात फ़ुटा पर्यंत असते. शक्यतो रात्रीच फ़िरतो. |
|  | फ़ुरसे - (Saw-Scaled Viper)- हा विषारी साप आहे. याचा रंग मातकट तपकीरी असुन पाठीवर शंकर पाळ्य़ांप्रमाणे नागमोडी नक्षी असते. डोके त्रिकोणी व चपटे असते. हा साप दिनचर आहे. याची लांबी पाऊण फ़ुटापर्यंत असते. याचे मुख्य खाद्य विंचू आहे. |

| | |
|---|---|
|  | विषारी समुद्र साप- खुजा समुद्र साप व अनेक दातेरी साप-<br>पिवळ्या, तपकिरी, काळपट रंगावर काळे आडवे पट्टे अशा रंगांमध्ये हा साप आढळतो. सात फ़ुटापर्यंत वाढणारा हा साप मासे व इतर जलचर खातो. समुद्रातील सर्व साप समुद्र किनारी निपचित पडून असल्याने ते मेलेले असावेत असा भास होतो. त्यामुळे त्यांना उचलण्याचा अथवा हाताळण्याचा मोह आवरावा. |
|  | धामण:- (Rat Snake)<br>हा बिनविषारी साप आहे. याचा रंग हिरवट पिवळा असुन बारा फ़ुट लांब असतो.  उंदीर याचे प्रिय खाद्य आहे. वर्षभरात तो तीन लाख उंदीरांचा फ़डाशा पाडतो म्हणून याला शेतक-यांचा मित्र असे म्हणतात. |
|   | कवड्या:- Common Wolf Snake - दोन ते अडीच फ़ुटापर्यंत वाढणा-या कवड्या सापाचा रंग काळा किंवा तपकिरी असून त्यावर पांढरे किंवा पिवळसर आडवे पट्टे डोक्याकडून सुरु होऊन शेपटीकडे येताना संपतात. याचे मुख्य खाद्य पाली व सरडे असल्याने हा ब-याचदा टॉयलेट, बाथरुम व घराच्या माळ्यावर आढळतो. हा दिनचर व निशाचर साप विषारी मण्यार (कांडर) सारखा दिसतो. म्हणून लोक याला विषारी मण्यार (कांडर) समजून मारुन टाकतात. |
|  | हरणटोळ-(Vine Snake)- हा सौम्य विषारी साप आहे. हिरव्या रंगाचा हा साप शक्यतो झाडांवर आढळतो. याची लांबी चार ते पाच फ़ुटा पर्यंत असते. याची शेपटी लांब व टोकदार असते. यांचे डोळे बटबटीत व मोठे असतात. |

| | |
|---|---|
|  | <u>ब्राऊन ऑल</u><br>Brown Awl (50 to 55 mm) तपकिरी रंगाचे हे फुलपाखरू अतिशय जलद गतीने उडते. फुले, पक्षीविष्ठा आणि ओलसर जागा ह्या फुलपाखराला विशेष प्रिय असतात. पावसाळ्याच्या दिवसात हे फुलपाखरू बरेचदा दृष्टीस पडते. बेहड्याच्या झाडावर ह्या फुलपाखराचे सुरवंट दृतात. |
|  | <u>ट्रायकलर्ड पाइड फ़्लॅट</u><br>Tricolored Pied Flat (40 to 46 mm) नावाप्रमाणेच ह्या फुलपाखरांच्या पंखावर तीन रंगाचे ठिपके असतात. पावसाळ्याच्या दिवसात दिंड्याच्या फुलांवर हे फुलपाखरू इतर फुलपाखरांसोबत दिसते. ह्याची वैशिष्ट्यपूर्ण सवय म्हणजे पानाखाली जाऊन बसणे वेगात उड्णारे हे फुलपाखरू सावलीत रहाणे पसंत करते |
|  | <u>वॉटर स्नो फ़्लॅट</u><br>Water Snow Flat (37 to 44 mm) अतिशय वेगात उड्णारे हे फुलपाखरू जंगलातल्या नाल्यांजवळ जास्त आढळते. कोकणातल्या सुपारीच्या किंवा आंब्यांच्या बागांमध्ये सुदधा हे फुलपाखरू दिसते. ह्याच्या पंखांवरील पांढऱ्याशुभ्र भागामुळे ह्या फुलपाखराला वॉटर स्नो फ़्लॅटअसे म्हणतात पावसाळ्याच्या शेवटी हे फुलपाखरू कोंकणात मोठ्या संखेने दिसते. |
|  | <u>कॉमन ब्लु बोटल</u><br>Common Blue bottle (70 to 80mm) वेगात उडणाऱ्या या सुंदर फुलपाखराचे वैशिष्ट्य म्हणजे पंखाच्या मध्ये असणारा निळसर हिरवट पट्टा सदाहरित जंगले ह्या फुलपाखराला विशेष प्रिय असतात. दालचिनी, अशोकवर्गीय झाडांवर याचे सुरवंट वाढतात. उन्हाळ्याच्या दिवसात बरेचदा इतर फुलपाखरांसोबत चिखलपान करताना दिसतात. |

| | |
|---|---|
|  | कॉमन रेड आय<br>Common Red eye (40 to 55mm) तपकिरी रंगाच्या ह्या फुलपाखराचे वैशिष्ट्य म्हणजे गुंजेसारखे रक्तवर्णीळे. बांबूच्या जंगलात हे फुलपाखरू वास्तव्य करते. हयाचे सुरवंट बांबूवरच जगतात. |
|  | ग्रास डेमॉन<br>Grass Demon (40 to 48mm) काळ्या पांढऱ्या रंगाचे हे फुलपाखरू वेगात उडते. पानगळीचे तसेच अर्धसदाहरित जंगलात रहाणारे हे फुलपाखरू कोकणात सर्वत्र दिसते. रान आले, रान हळद, सोनटक्क्याच्या झाडावर याचे सुरवंट दिसतात. |
|  | इंडियन स्कीपर<br>Indian Skipper (24 to 27mm) संपूर्ण भारतभरात हे फुलपाखरू गवताळ भागात जास्त प्रमाणात दिसते. छोट्या वनस्पतींची फुले याना जास्त प्रिय असतात. |
|  | चेस्टनट बॉब<br>Chestnut Bob (26 to 30mm) अतिशय छोटे पण आकर्षक असे हे फुलपाखरू जंगलामध्ये जास्त आढळते. तपकिरी रंगाच्या पंखांवर असणाऱ्या चंदेरी ठिपक्यांमुळे हे विशेष आकर्षक दिसते. छोट्या फुलांवर हमखास दिसणारे हे फुलपाखर पावसाळ्यात जास्त संख्येने दिसते. |

| | |
|---|---|
|  | कॉमन जे<br>Common Jay (70 to 80mm) कॉमन ब्लुबोटलचा भाइबंद असे ह्या फुलपाखराला म्हणता येइल. फ़क्त ह्याच्या पंखावर निळसर हिरवट पट्टा नसतो. अतिशय वेगात उडणारे हे फुलपाखरू फुलावर बसताना सुदधा पंख फ़डफ़डत ठेवते. खूप मोठ्या संख्येने एकत्र जमून चिखलपान करण्यासाठी हे फ़ुलपाखरू प्रसिदध आहे. |
|  | कॉमन माइम<br>Common Mime (90 to 120mm) कॉमन माइन या फ़ुलपाखराचे वैशिष्ट्य म्हणजे ह्याची दोन वेगवेगळी रूपे. Clytia रूप कॉमन क्रोची नक्कल करते तर Dissimilis रूप ब्लू टायगरची नक्कल करते. ह्या फ़ुलपाखराचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे वाळल्या काठीसारखा असणारा कोश ह्या फ़ुलपाखराचे सुरवंट दालचिनीच्या झाडावर आढळतात. |
|  | कॉमन मोरमॉन<br>Common Mormon (90 to 100mm) कोकणात सगळ्यात जास्त दिसणाऱ्या फ़ुलपाखरांपैकी एक म्हणजे कॉमन मोरमॉन. ह्या फ़ुलपाखराची मादी कॉमन रोझ व क्रिम्सन रोझ ह्या विषारी फ़ुलपाखरांची नक्कल करते. लिंबू आणि कढीपत्त्याच्या झाडावर ह्या फ़ुलपाखराचे सुरवंट आढळतात. पावसाळ्याच्या दिवसात बागेतल्या कलेरोडेंड्रोनच्या लाल फ़ुलांवर ही फ़ुलपाखरे हमखास दिसतात. |
|  | ब्लू मोरमॉन<br>Blue Mormon (120 to 150mm) कोकणात दिसणाऱ्या आकाराने सर्वात मोठ्या फ़ुलपाखरांपैकी दुसऱ्या क्रमांकावर असणारे हे फ़ुलपाखरू पावसाळ्याच्या शेवटी मोठ्या प्रमाणात दिसते. सदाहरित जंगले ह्या फ़ुलपाखराला जास्त आवडतात. |